# <u>पुणे मेट्रो सेवेला एक आठवडा पूर्ण, पुणेकरांचा उदंड प्रतिसाद</u>




मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे मेट्रोचे ६ मार्च २०२२ रोजी उदघाट्न झाले आणि दुपारी ३ वाजेनंतर वनाझ ते गरवारे आणि PCMC ते फुगेवाडी या दोन मार्गावर मेट्रो सेवेचा आरंभ झाला. दुपारी २ वाजेनंतर स्थानकांकडे नागरिकांची रीघ सुरु झाली व ३ वाजेनंतर मोठ्यासंख्येने नागरिक मेट्रोचा प्रवास करू लागले. पहिल्याच दिवशी ३७७५२ नागरिकांनी मेट्रोद्वारे प्रवास केला.

मेट्रोमध्ये प्रवास करण्याचे प्रत्येक पुणेकराचे स्वप्न होते आणि त्यामुळे मोठ्यासंख्येने नागरिकांनी ६ मार्च ते १३ मार्च दरम्यान मेट्रोमधून प्रवास केला. दि. १३ मार्च रोजी तब्बल ६७३५० नागरिकांनी मेट्रोतून प्रवास केला. एका दिवसात प्रवास करण्याची हि आतापर्यंत सर्वात मोठी संख्या होती. दि. १३ मार्च रोजी मेट्रोला अधिकतम १०,०७,९४० रुपये उत्पन्न मिळाले. जेष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण, कुटुंबे आणि विविध प्रकारचे गट इ. मोठ्या संख्येने मेट्रोमधून प्रवासासाठी येत आहेत. फोटो, सेल्फी, सोशल मीडियावर पोस्ट टाकणे याद्वारे पुणेकर आपल्या मेट्रो बद्दलच्या भावना व्यक्त करत आहेत. पुणे परिसरातील काही शाळेतील विद्यार्थी पुणे मेट्रोचा अनुभव घेण्यासाठी मेट्रो प्रवास करत आहेत.

आतापर्यंत मागील आठवड्यात (६ मार्च ते १३ मार्च) २,२७,९५० प्रवाश्यांची मेट्रोद्वारे प्रवास केला व एकूण ३२,४५,६७३ रुपये उत्पन्न त्याद्वारे मेट्रोला मिळाले. एकेदिवशी अधिकतम प्रवासी संख्या ६७,३५० होती व त्या दिवशी

मेट्रोला १०,०७,९४० रुपये उत्पन्न मिळाले. मागील आठवड्याचा विचार केल्यास सरासरी ३४,२४३ नागरिकांनी प्रतिदिन प्रवास केला व त्याद्वारे सरासरी ४,०५,७०९ रुपये उत्पन्न मिळाले



प्रवाश्यांच्या सोयीसाठी पुणे मेट्रोने अँड्रॉइड व ios मोबाईल अँप उपलब्ध करून देण्यात आले आहे. आतापर्यंत २६,७४२ लोकांनी अँप डाउनलोड करून त्याचा वापर सुरु केला आहे. मोबाईलद्वारे तिकीट काढण्याचे प्रमाण वाढले आहे. अधिकाधिक पुणेकरांनी मोबाईल अँपचा वापर करून पर्यावरण संवर्धनाला मदत करावी असे आवाहन महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षित यांनी केले आहे. प्रवाश्यांच्या सोयीसाठी महामेट्रोने सरकते जिने, लिफ्ट, तिकीट खिडकी आणि AFC गेट येथे माणसांची नियुक्त केली आहे.